ePaper


## गुंडांना संरक्षण असेल, तर तपास कसा होणार?; एकनाथ खडसें



| वर्ष - 6 | अंक - 137 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### आतील पानांत


- पिंपरीत खड्ड्यांचे साम्राज्य, स्मशानभूमीतही अतिक्रमणे
- सुरक्षारक्षकांची आर्थिक पिळवणूक
- राज्यातील नवनियुक्त मंत्र्यांना बंगल्याचे वाटप


www.mahaenews.com | बुधवार | दिनांक 24 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## देखभाल दुरुस्तीसाठी कोट्यवधींचा खर्च

# शहरातील रस्त्यांची चाळण !

### मामुर्डीतील रस्ते डांबरीकरणासाठी साडेदहा कोटीचा खर्च, देहू-आळंदी रस्त्यासाठी 25 कोटी 24 लाख

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड** शहरात गेल्या दोन ते अडीच वर्षात रस्तेविकासावर जवळपास साडेसहाशे कोटी रुपये खर्च करण्यात आले. उपनगरे, कॉलन्यांमध्ये जेथे रस्ते नाही तेथे खडीचे, जेथे खडीकरण झाले आहे. तेथे डांबरीकरणाचे काम हाती घेण्यात आले. नवीन रस्ते तयार करताना अनेक भागात रस्त्यांवर फक्त डांबर फासण्यात आले. परंतु, पावसाळ्यात रस्त्याच्या गुणवत्तेचे पितळ उघडे पडले. अनेक भागात रस्ते खड्डयात गेले.अशी रस्त्याची चाळण झालेली असताना असताना पुन्हा डांबरीकरणाची कोट्यवधीची कामे काढण्यात आली आहेत.



महापालिकेच्यावतीने विकासनगर, मामुर्डी (प्रभाग क्रमांक १६) येथील ताब्यात आलेले रस्ते डांबरीकरणासह विकसित करण्यात येणार आहेत. या कामासाठी १० कोटी ६४ लाख रूपये खर्च होणार आहेत. महापालिकेच्यावतीने विकासनगर, मामुर्डी (प्रभाग क्रमांक १६) येथील ताब्यात आलेले रस्ते डांबरीकरण व विकसित करण्यात येणार आहेत. त्यासाठी ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या. निविदा दर १५ कोटी २४ लाख ९५ हजार रूपये खर्च अपेक्षित धरण्यात आला. त्यामध्ये रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग शुल्क वगळून निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार, पाच ठेकेदारांनी निविदा सादर केल्या. त्यापैकी क्लिन्सी कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड या ठेकेदाराने निविदा दरापेक्षा ३१.७७ टक्के कमी दराने निविदा सादर केली. म्हणजेच १० कोटी ३९ लाख २८ हजार रूपये अधिक रॉयल्टी चार्जेस २३ लाख ६६ हजार आणि मटेरीयल टेस्टींग चार्जेसपोटी १ लाख ७४ हजार रूपये असे एवूÂण १० कोटी ६४ लाख ६९ हजार रूपये खर्च होणार आहेत.

### रस्ते देखभाल-दुरूस्तीसाठी एक कोटी

**देहू-आळंदी या ३० मीटर विकास आराखड्यातील रस्त्याची देखभाल-दुरूस्ती आणि स्थापत्य विषयक काम करण्यात येणार आहे. या कामासाठी निविदा दर १५ कोटी २४ लाख ९५ हजार रूपये खर्च अपेक्षित धरण्यात आला. त्यामध्ये रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग शुल्क वगळून निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार, दोन ठेकेदारांनी निविदा सादर केल्या. त्यापैकी परमानंद ए. क्रीपलानी या ठेकेदाराने निविदा दरापेक्षा ३६.९ टक्के कमी दराने निविदा सादर केली. म्हणजेच ९७ लाख २३ हजार रूपये अधिक रॉयल्टी चार्जेस ७४ हजार आणि मटेरीयल टेस्टींग चार्जेसपोटी ४१ हजार रूपये असे एवूÂण ९८ लाख ४० हजार रूपये खर्च होणार आहेत. एक वर्षात हे काम पूर्ण करण्यात येणार आहे.**

# प्रशासक काळात संशयास्पद निर्णय?

## मारुती भापकर यांची मागणी : राजेश पाटील यांचे 'ते' निर्णय रद्द करा

**पिंपरी चिंचवड।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड** महापालिकेचे तत्कालीन प्रशासक तथा आयुक्त राजेश पाटील यांच्या प्रशासकीय कार्यकाळातील संशयास्पद निर्णयांची चौकशी करावी. चुकीचे, महापालिकेचे नुकसान करणारे निर्णय रद्द करावेत. या प्रकरणातील दोषींवर कायद्याप्रमाणे कठोर कारवाई करावी अशी मागणी माजी



नगरसेवक मारुती भापकर यांनी केली आहे. याबाबत नवनियुक्त आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यात भापकर यांनी म्हटले आहे

> **स्थायी समितीत मनमानी पद्धतीने कोटयावधी रुपयांच्या कामांना प्रशासक म्हणून मंजुरी दिली. त्याचबरोबर काही धोरणात्मक निर्णय देखिल घेण्यात आले. हे सर्व निर्णय संशयास्पद असून या निर्णयांची चौकशी करुन या निर्णयांवर फेरविचार करावा.**
>
> **- मारुती भापकर, सामाजिक कार्यकर्ते.**

की, नगरसेवंकांचा निर्धारीत पाच वर्षांचा कार्यकाळ 13 मार्च 2022 रोजी संपुष्टात आला. 14 मार्च 2022 ते 17 मार्च 2022 या कालावधीत आयुक्त राजेश पाटील यांनी प्रशासक पदाची धुरा सांभाळताना खालील संशयास्पद निर्णय घेतले आहेत.

भापकर यांनी म्हटले आहे की, यांत्रिकी पद्धतीने रस्ते सफाई करण्याच्या 362 कोटी रुपयांच्या विषयाला मंजुरी देणे. नवीन महापालिका भवनाची 312 कोटी रुपयांची निविदा काढणे, स्मार्ट सिटी अमृत योजना, पाणीपुरवठा, आरोग्य, स्थापत्य, जल निस:रण, पर्यावरण आदी विभागात नेमलेल्या त्याच त्याच सल्लागारांना मुदतवाढ देणे. स्पर्श घोटाळा, कचरा डेपो आग प्रकरण, कुत्र्यांची नसबंदी, वैद्यकीय विभागामार्फत डॉक्टर/कर्मचारी/नर्सेस/सुरक्षारक्षक नेमण्याचा ठेका व त्यातील बनावट कागदपत्रे प्रकरण, वेगवेगळया दोषी अधिकाऱ्यांवरील चौकशी अहवालांची फेरतपासणी करुन हे अहवाल सार्वजनिक करणे. शिक्षण मंडळाच्या वतीने शालेय साहित्य वाटप प्रकरण, दक्षता व नियंत्रण विभागामार्फत झालेल्या चौकश्यांची चौकशी, शहरातील स्वच्छतेबाबत कोटयावधींचा खर्च करणे, जलतरण तलाव, नाटयगृहांचे खाजगीकरण करणे, स्मार्ट सिटीच्या कामांना मंजुरी देणे, अधिका-यांना पदोन्नती देणे, नोकर भरती प्रकरण, वाढीव खर्च, थेट पद्धतीची कामे या प्रकरणी आपण स्वत: जातीने लक्ष घालावे, अशी मागणीही भापकर यांनी केली आहे.

# पिंपरीत खड्ड्यांचे साम्राज्य, स्मशानभूमीतही अतिक्रमणे !

## जनसंवाद सभेत नागरिकांच्या तक्रारींचा पाढा कायम

**पिंपरी । । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

सततच्या पावसामुळे शहरभरात जागोजागी खड्डे पडले असून ते तातडीने बुजवण्यात यावेत. पिंपरीतील स्मशानभूमीतील अतिक्रमण तात्काळ हटवावे. यासह विविध मागण्या पिंपरी-चिंचवड शहरवासियांनी जनसंवाद सभेच्या माध्यमातून पालिका प्रशासनाकडे केल्या आहेत. पिंपरी पालिकेतील प्रशासकीय राजवटीत नागरिकांना भेडसावणाऱ्या तक्रारी, अडचणी मांडण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय साप्ताहिक जनसंवाद सभांचे आयोजन करण्यात येते. या ठिकाणी नागरिकांनी विविध अडचणी मांडल्या आहेत. फेरीवाल्यांचे नव्याने सर्वेक्षण करून त्यांना परवाना देण्यात यावेत. झाडांना





लावण्यात आलेल्या संरक्षक जाळ्यांमुळे झाडांची वाढ खुंटली आहे, अशा झाडांच्या जाळ्या तात्काळ काढाव्यात. जलवाहिन्यांची अर्धवट कामे पूर्ण करावीत तसेच फुटलेल्या जलवाहिन्या दुरुस्त कराव्यात. कचरा संकलित करण्यासाठी घंटागाडी पाठवावी. उघड्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर कारवाई करावी. अतिक्रमणे काढलेल्या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

रस्त्यांच्या बाजूने पथदिवे लावावेत. खाजगी जागेतील बांधकामामुळे रस्त्यावर राडारोडा पडून रहदारीस अडथळा निर्माण होतो, याबाबत संबंधितांना दंड करावा. शहरात आवश्यक ठिकाणी सार्वजनिक शौचालय उभारावेत. रस्त्याच्या मध्यभागी आणि पदपथावरील निघालेले सिमेंटचे ढोकळे तात्काळ बसवावेत, अशा सूचना व तक्रारी जनसंवाद सभेत नागरिकांनी केल्या. यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याची ग्वाही पालिका अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

---

### स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या नियुक्त्यांच्या मागणीसाठी

# पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर भीक मागो आंदोलन

जय गोविंदा...नियुक्ती होईल का यंदा, गणपती बाप्पा मोरया...यंदाच्या वर्षी जॉईनिंग लवकर होऊ द्या, अशी उमेदवारांकडून घोषणाबाजी

**वेल्हे। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊनही नियुक्ती न मिळाल्याने एक हजार १४३ उमेदवारांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज भीक मागो आंदोलन केले

एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊनही नियुक्ती न मिळाल्याने एक हजार १४३ उमेदवारांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर




आज भीक मागो आंदोलन केले . जय गोविंदा नियुक्ती होईल का यंदा, गणपती बाप्पा मोरया यंदाच्या वर्षी जॉईनिग लवकर होऊ द्या... अशा विद्यार्थ्यांकडून घोषणा देण्यात आल्या. दरम्यान स्पर्धा परिक्षा देणारा स्वप्निल लोणकर या तरुणांने आत्महत्या केल्याची घटना घडली होती. सरकाराच्या दिरंगाईमुळे स्वप्निलला आत्महत्या करावी लागली असा आरोप करत 'मी पण स्वप्निल लोणकर' असे पोस्टर घेऊन उमेदवार आंदोलनात सहभागी झाले होते. २०१९ मध्ये झालेल्या एमपीएससी परीक्षेत एक हजार १४३ उमेदवार उत्तीर्ण झाले होते.

हा निकाल लागून आता तीन वर्षाचा काळ लोटला. पण राज्य सरकारने आमच्या नियुक्त्या केल्या नाहीत. या सरकारच्या दिरंगाईमुळे स्वप्निल लोणकर या आमच्या मित्राला आत्महत्या करावी लागली. याला सरकार जबाबदार असून अजून किती स्वप्निल सारख्या उमेदवारांची आत्महत्या करण्याची हे सरकार वाट पाहणार आहेत. त्यामुळे या सरकारने आमच्या सर्वांच्या नियुक्त्या कराव्या, आज आम्ही भीक मागो आंदोलन करीत आहोत. आमच्या आंदोलनाची राज्य सरकारने दखल घ्यावी, अन्यथा भविष्यात आणखी तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा देखील उपस्थित उमेदवारांनी यावेळी दिला.

# सुरक्षारक्षकांची आर्थिक पिळवणूक!

## आमदार लक्ष्मण जगताप : 'क्रिस्टल' कंपनीच्या कारभारवर आक्षेप

पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महापालिकेची विविध कार्यालये, मिळकती, दवाखाने व उद्यानांच्या सुरक्षेचे काम करणाऱ्या सुरक्षारक्षकांना गेल्या तीन महिन्यांपासून वेतन दिले गेलेले नसल्याने आमदार लक्ष्मण जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना पत्र लिहून प्रशासनाला चांगलेच खडसावले आहे. या सुरक्षारक्षकांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या क्रिस्टल या ठेकेदार कंपनीवर तातडीने कडक कारवाई करा, सुरक्षारक्षकांचे थकित वेतन विनाविलंब अदा करण्याचे आदेश द्या. तसेच यापुढे सर्व सुरक्षारक्षकांचे वेतन ठरलेल्या वेळेत मिळेल याची महापालिकेने व्यवस्था करावी, अशी सूचना त्यांनी पत्रात केली आहे.

यासंदर्भात आमदार लक्ष्मण



जगताप यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, "महापालिकेच्या मालकीच्या मिळकती, दवाखाने, उद्याने, कार्यालयांची सुरक्षा करण्यासाठी क्रिस्टल या खासगी कंपनीला कोट्यवधींचे काम देण्यात आले आहे.

या खासगी कंपनीने कंत्राटी पद्धतीने सुरक्षारक्षक नेमलेले आहेत. त्याचे पैसे महापालिका




वेळच्या वेळी क्रिस्टल कंपनीला देत आहे. पण क्रिस्टल कंपनीमार्फत सुरक्षारक्षकांना दरमहा वेळेवर वेतन दिले जात नाही. गेल्या तीन महिन्यांपासून हे वेतन थकित आहे. त्याचप्रमाणे मार्च २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीतील भविष्य निर्वाह निधीची (पीएफ) रक्कमही क्रिस्टल कंपनीने सुरक्षारक्षकांच्या खात्यात जमा केले नसल्याच्या तक्रारी माझ्याकडे प्राप्त झाल्या आहेत.

तसेच क्रिस्टल कंपनी सर्व सुरक्षारक्षकांना कामगार कायद्याअंतर्गतचे कोणतेही लाभ देत नाही. नियमानुसार वेतनवाढही करत नाही. ही ठेकेदार कंपनी महापालिकेसोबत झालेल्या करारातील अटींचे कोणत्याही प्रकारचे पालन करत नसल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. यासंदर्भात संबंधित सुरक्षारक्षक व काही लोकप्रतिनिधींनी तक्रार करून क्रिस्टल कंपनीचे व्यवस्थापक व वरिष्ठ अधिकारी दाद न देता उद्धटपणाने वागणूक देत असल्याबाबतच्याही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

### वेतन वेळेत मिळणेबाबत कार्यवाही करा...

आर्थिक पिळवणुकीविरोधात संबंधित सुरक्षारक्षकांनी महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना अनेकदा निवेदने दिली आहेत. काहींनी आंदोलनही केले आहेत. तरीही महापालिका प्रशासन दबावापोटी योग्य कार्यवाही करत नसल्याचे सुरक्षारक्षकांचे म्हणणे आहे. सुरक्षारक्षकांना आपल्या मेहनतीच्या कामाचे वेतन वेळेवर न मिळत नसल्याने त्यांच्यासमोर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. एका सुरक्षारक्षकाने आत्महत्येचाही प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. या प्रश्नांवर महापालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. सुरक्षारक्षकांना कामगार कायद्यांतर्गत असलेले लाभ व रखडलेले वेतन करण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई करणाऱ्या क्रिस्टल कंपनीवर तातडीने कडक कारवाई करण्यात यावी. सुरक्षारक्षकांचे थकीत वेतन तातडीने अदा करण्यात यावे. तसेच यापुढे त्यांना दरमहा वेळेवर वेतन मिळणेबाबत प्रशासकीय स्तरावरून तातडीने कार्यवाही व्हावी, अशी सूचनाही आमदार जगताप यांनी केली आहे.

---

# माझा सन्मान दिनदुबळ्या नागरिकांना अर्पण !

## सामाजिक कार्यकर्ते संजय भिसे : पिंपरी-चिंचवड भूषण पुरस्कार प्रदान

पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।

जनसेवा हेच ध्येय डोळ्यासमोर ठेवून गेली अनेक वर्ष लोकांची कामे करत आलो. परमेश्वराने दिलेल्या दोन हाताने दिनदुबळ्यांची सेवा करण्याची संधी मिळाली. त्याच संधीचं सोनं झालं असून, हा पुरस्कार त्याचेच प्रतिक आहे. त्यामुळे हा सन्मान पिंपळे सौदागरमधील दिनदुबळ्या, दिव्यांग, अंध-अपंग, ज्येष्ठ, कष्टकरी, कामगार वर्गातील नागरिकांच्या चरणी अर्पण करतो. त्यांनी सेवा करण्याची संधी दिली नसती, तर हा सन्मान घेण्याचा योगच आला नसता, अशी भावना उन्नती सोशल फाऊंडेशनचे संस्थापक तथा सामाजिक कार्यकर्ते संजय उर्फ आबा भिसे यांनी व्यक्त केली.

सातारा जिल्हा मित्र मंडळ, सांगली जिल्हा मित्र मंडळ, पश्चिम महाराष्ट्र युवा मंच, साकोसां महिला




मंडळ, साकोसां ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने संजय उर्फ आबा भिसे यांना भाजपाचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप आणि पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे यांच्या हस्ते पिंपरी-चिंचवड भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आकुर्डीतील खंडोबा (माळ) मंदिर सांस्कृतिक भवन येथे कार्यक्रम पार पडला. यावेळी माजी नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, माजी नगरसेविका सविता खुळे, माधुरी कुलकर्णी आदी उपस्थित होते.

> *उन्नती सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून आम्ही केवळ पिंपळे सौदागरच नव्हे तर कोकण, पश्चिम महाराष्ट्र, सातारा, सांगली, कोल्हापूर, चिपळून आदी भागात नागरिकांची कामे केली. पूर परिस्थितीत सांगली, कोल्हापूर येथील नागरिकांना खाद्य पदार्थ, कपडे वाटप केले. कोकणात देखील पूर परिस्थितीत मदत केली. कोरोना काळात पिंपळे सौदागरमध्ये प्रत्येक सोसायटीत राहणाऱ्या कुटुंबियांना खाद्यपदार्थ वाटप केले. पॉझिटिव्ह रुग्णांना बेड उपलब्ध करून दिले. रेमडेसीवीर इंजेक्शन उपलब्ध करून दिले. एवढेच नव्हे तर कोरोनाच्या सुरूवातीच्या काळात घरोघरी आरसेनिक अलबम गोळ्या वाटप केल्या. ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले, विद्यार्थी आदी सर्वांच्या सेवेसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत.*
>
> *- संजय उर्फ आबा भिसे, सामाजिक कार्यकर्ते.*

## संपादकीय »

# खेचाखेची शुभ्र सदऱ्यांची...

***केंद्रात भारतीय जनता पक्षाची सत्ता असताना राजधानी दिल्लीचे राज्य मात्र आम आदमी पक्षाचे अरविंद केजरीवाल पुन्हा पुन्हा जिंकून घेतात, ही गोष्ट भाजपच्या विजीगिषु वृत्तीला आवडली नसणार, हे उघडच आहे.***

पण केजरीवाल यांचा दिल्लीतील विजय केवळ स्पष्ट नव्हता तर इतर सर्व पक्षांचा निदान दिल्ली विधानसभेत पुरता पालापाचोळा करून टाकणारा होता. केजरीवाल हे अत्यंत महत्त्वाकांक्षी आहेत. पंजाबमध्ये त्यांनी मोठा विजय मिळवला आणि गेल्या महिन्याभरात ते पाचवेळा गुजरातमध्ये जाऊन आले आहेत. आत्ता राजधानीत उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यावर सीबीआयचे छापे पडत असताना हे दोघेही गुजरातमध्येच आहेत. ही सारी पार्श्वभूमी लक्षात ठेवून सिसोदिया यांच्यावर केंद्रीय तपास यंत्रणांच्या कारवाईकडे पाहिले पाहिजे. केजरीवाल हे सातत्याने 'प्रामाणिक राजकारणा'ची गरज बोलवून दाखवत असतात. आपला पक्ष सोडून इतर सर्व पक्ष भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत, असे त्यांचे म्हणणे असते. ते बऱ्याच प्रमाणात खरेही आहे. अण्णा हजारे यांना त्यांनी उगाच सन्मानाने राजधानीत नेले नव्हते. मात्र, केजरीवाल यांचा हा दावा भाजपला खोडून काढायचा आहे. केजरीवाल आणि आम आदमी पक्षाची विश्वासार्हता घालवायची असेल तर राजकीय मैदानातले ते इतरांसारखेच एक आहेत, हे भाजपला सिद्ध करायचे आहे. दिल्लीचे मंत्री सत्येंद्र जैन त्यामुळेच तुरुंगात आहेत. उद्या मनीष सिसोदिया यांनाही अटक झाली तर आश्चर्य वाटायला नको. एकीकडे नरेंद्र मोदी 'ना खाऊंगा, ना खाने दूंगा' असे म्हणत असताना केजरीवाल यांनीही निर्मळ व स्वच्छ कारभाराचा दावा करणे म्हणजे 'भला, उसकी कमीज मेरे कमीज से सफेद कैसे?' हा प्रश्न विरोधकांच्या मनात पेरण्यासारखे होते. त्याची शिक्षा केंद्रीय तपास यंत्रणांच्या मार्फत मोदी सरकार केजरीवाल यांना देत आहे.

मनीष सिसोदिया यांच्यावर दारूच्या दुकानांचे परवाने वाटताना केलेल्या गैरव्यवहारांचे आरोप गंभीर आहेत. त्यातल्या अपहाराचा किंवा सरकारच्या नुकसानीचा आकडा काही हजार कोटींच्या घरातही जाऊ शकतो. देशभरात खरी व खोटी दारूबंदी, दारूचे व्यक्तिगत व विक्री परवाने, दारूवरचा अबकारी कर, देशी दारूची विक्री आणि त्या पलीकडे बनावट दारूचे प्रचंड उत्पादन हा हजारो कोटींचा मामला आहे. त्यात देशभरात लाखो लोक काम करीत असतात आणि त्यांना सर्व यंत्रणा सुखरूप सांभाळत असतात. असे असताना आज राजधानीत भाजप, आप आणि काँग्रेस हे तिघेही उरलेल्या दोघांचे गूळपीठ असून जोडीने गैरव्यवहार चालल्याचा आरोप करीत आहेत. हे म्हणजे मुंबई महापालिकेत सर्वांचा सहभाग असणाऱ्या पाच-तीन-दोनच्या खेळासारखेच आहे.



## आनंदी सकाळ

# दृष्टी बदला म्हणजे जग बदललेले दिसेल!

जगात अनेक वंदनीय व्यक्ती असतात. त्यांना केलेले वंदन अखेर देवालाच पोहोचते. तद्वतच, मैत्री. ती भगवंताशी करावी. भगवंत कोण, तर ज्याच्याकडे देवाचे गुण आहेत. दया, करुणा, शांती, प्रीती, त्याग, अहिंसा ही मानवी मूल्ये आहेत. ती देवाला प्रिय आहेत. ज्याच्याकडे हे गुण आहेत, त्याच्याशी सख्य करा, त्याच्यावर प्रेम करा, त्याच्याशी दोस्ती करा. असा दोस्त अवतीभवती असतो. तो ओळखायला हवा. ज्याच्याकडे दैवी गुण आहेत, त्याच्यापुढे नतमस्तक व्हावे. देवळात झाडू मारूनच देवसेवा होते असे नाही. ज्याला गरज आहे, त्याची सेवा करा. तीच देवसेवा. दिवसभर सकारात्मक गोष्टी पाहा. त्यांचा विचार करा. प्रेरक जीवनांमधून प्रेरणा घ्या. आपली सेवा इतरांनी करावी, या भावनेपेक्षा इतरांची सेवा करण्याचा विचार करा. हृदय विशाल व व्यापक करा. मग आयुष्य आनंददायी होईल. परमात्म्याशी एकरूप होणे, म्हणजे चांगले गुण आत्मसात करणे. मग संकुचित विचार संपतील.

# गांधीयुक्त की गांधीमुक्त भारत हवा?




देशावर अनेक दशके राज्य केलेल्या, स्वातंत्र्यलढ्यात अग्रभागी राहिलेल्या आणि जवळपास दीड शतक भारताच्या इतिहासाच्या हातात हात घातलेल्या काँग्रेसच्या आजच्या अवस्थेचे सर्वाधिक दुःख व वेदना या पक्षाच्या तत्त्वांवर, कार्यक्रमांवर आणि घोषणांवर विश्वास ठेवून आयुष्यभर काम केलेल्या सामान्य पण देशभक्त कार्यकर्त्यांना होत असेल. देशभरात आजही असे हजारो कार्यकर्ते असतील. डॉ. मनमोहन सिंग यांचे सरकार गेल्यापासून गेली आठ वर्षे हा कार्यकर्ता दिशाहीन, नेतृत्वहीन बनला आहे. राष्ट्रीय नेतृत्वाने खंबीर राहून संघर्ष केला, सातत्य ठेवले आणि संवाद



साधला तर कार्यकर्त्यांची उमेद टिकते. तीच उमेद ते सामान्य मतदारांना देतात. सामान्य मतदारांचा असा विश्वास मग मतपेटीत उतरतो. काँग्रेसमधले हे सारे चक्रच बिघडून गेले आहे. राहुल गांधी यांनी दुसऱ्या पराभवाची नैतिक जबाबदारी घेऊन अध्यक्षपदाचा राजीनामा दिला; त्याला आता तीन वर्षे होऊन गेली. तरीही, आज पक्षाचे अनिभिषिक्त नेते तेच आहेत. असे असेल तर ते औपचारिकपणे पक्षाचे अध्यक्षपद का स्वीकारत नाहीत? राहुल गांधी हे अध्यक्षपद स्वीकारण्यास आजही अनुत्सुक आहेत, अशा बातम्या पुन्हा आल्यानंतर काही नेत्यांना हे पद मग प्रियांका गांधी यांनी स्वीकारावे असे वाटू लागले. सोनिया गांधी यांची प्रकृती पाहता हंगामी अध्यक्षपदाचा भार त्यांच्यावर किती काळ ठेवणार, हाही प्रश्नच आहे. मात्र, काँग्रेस पक्षाचे सर्व वरिष्ठ नेते या अध्यक्षपदाचा विचार गांधी कुटुंबाच्या परिघाच्या बाहेर का नेत नाहीत, हा खरा प्रश्न आहे. राजीव गांधी यांची १९९१ च्या मे महिन्यात दुर्दैवी हत्या झाल्यानंतर सात वर्षे तरी काँग्रेस पक्ष हा गांधी कुटुंबाचे नेतृत्व थेट न स्वीकारता चालत होता. केंद्रातले सरकारही चालवत होता. मग या अनुभवातून काँग्रेस नेत्यांना आजही पुरेसा आत्मविश्वास मिळत नाही का?

गेले काही दिवस राजस्थानात काँग्रेसला विजय मिळवून देणारे, दिवंगत राजीव गांधी यांना जवळचे वाटणारे, राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांचे नाव अध्यक्षपदासाठी सतत चर्चेत येते आहे. त्यांचा दिल्लीतला सध्याचा वावर, राहुल गांधी यांच्या पत्रकार परिषदेतील लक्षणीय उपस्थिती आणि देशभर राजस्थान सरकारच्या प्रकाशित होणाऱ्या जाहिराती या सगळ्यावरून त्यांच्या नावावर गंभीरपणे विचार चालू असावा, असे दिसते. पक्ष नीट चालावा, यासाठी ज्या ज्येष्ठांनी 'वैचारिक बंड' केले, त्यात गेहलोत नव्हते. त्यांचे नाव गांधी कुटुंबाच्या मनात असेल तर निदान ते तरी लवकर निश्चित करावे. गेहलोत मोदींपेक्षा लहान असले तरी तेही ७१ वर्षांचे आहेत. सार्वत्रिक निवडणुका फार दूर नाहीत.

# सीबीआयचा राजकीय छापा-काटा

**धोरणाचे शिल्पकार आणि दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या निवासस्थानी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) घातलेले छापे, हा सदोदित राजकारणाचा विचार करणाऱ्या देशात योगायोग मानता येणार नाही.**

एकीकडे अमेरिकेच्या दैनिकातून दिल्लीच्या शिक्षण सुधारणांचे कौतुक होत असतानाच या धोरणाचे शिल्पकार आणि दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या निवासस्थानी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) घातलेले छापे, हा सदोदित राजकारणाचा विचार करणाऱ्या देशात योगायोग मानता येणार नाही.

एकीकडे अमेरिकेच्या दैनिकातून दिल्लीच्या शिक्षण सुधारणांचे कौतुक होत असतानाच या धोरणाचे शिल्पकार आणि दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या निवासस्थानी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) घातलेले छापे, हा सदोदित राजकारणाचा विचार करणाऱ्या देशात योगायोग मानता येणार नाही. दिल्ली सरकारचे मद्य धोरण गेल्या काही काळापासून वादाच्या भोवऱ्यात सापडले असून त्यामध्ये काही विशिष्ट ठेकेदारांना लाभ झाल्याचे आरोप करण्यात येत आहेत. या धोरणानुसार परवाना शुल्कात माफी दिल्याने



सरकारचे १४४ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची टीका होत आहे. त्यामध्ये सिसोदिया यांच्या निकटवर्तीयांच्या कंपन्यांना मोठा लाभ झाला असून 'आम आदमी' पक्षालाही त्यातील काही रकमा पोहोचल्याचा आरोप विरोधी भारतीय जनता पक्षाने केला आहे. त्याच प्रकरणी सीबीआयने हे छापे घातले असून यापुढील काळात त्यांना अटक होण्याचीही शक्यता वर्तविण्यात येत आहे. मात्र, यानिमित्ताने भाजप आणि आप यांच्यातील राजकीय लढाईला नव्याने तोंड फुटले आहे.

काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'रेवडी संस्कृती'चा उल्लेख करून थेट 'आप'ला लक्ष्य केले आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनीही त्यांना प्रत्युत्तर दिले आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर 'आप' तेथे सक्रिय होत असून, तेथेही मोफत विजेचे आश्वासन केजरीवाल यांनी दिले आहे. त्या पार्श्वभूमीवर या पक्षाच्या विरोधात आक्रमक व्हा, असा संदेश नुकताच भाजपच्या राज्य बैठकीत देण्यात आला होता. त्याचाच भाग म्हणजे हे छापे असावेत, अशी टीका होत आहे. मात्र, आतापर्यंत केवळ वाक्युद्धाच्या पातळीवर असलेल्या या लढाईत आता तपास यंत्रणांचीही एंट्री झाली आहे. यापूर्वी दिल्लीतील मंत्री सत्येंद्र जैन यांच्यावर तपास यंत्रणांनी कारवाई केली होती. मात्र, त्यानंतर थेट केजरीवाल यांच्यानंतर दुसऱ्या क्रमांकाचे नेते मानल्या जाणाऱ्या सिसोदिया यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

पूर्वीचे पत्रकार आणि माहिती अधिकार चळवळीतील कार्यकर्ते असलेले सिसोदिया ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या आंदोलनात आघाडीवर होते.

## ।। अभंगवाणी ।।




वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती ।
जाणा त्या निश्चितीं देव नाहीं ॥१॥
भाडेकरी वाहे पाठीवरी भार ।
अंतरीचें सार लाभ नाहीं ॥धृ.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### मुंबईतील ललित हॉटेल बॉम्ब उडवून देण्याची धमकी



। मुंबई । । महाईन्यूज ।

मुंबईतील प्रसिद्ध पंचतारांकित ललीत हॉटेलला बॉम्ब ठेवल्याची धमकी मिळाली आहे. अज्ञात व्यक्तीने हॉटेलमध्ये फोन करून ही धमकी दिली. या धमकीनंतर हॉटेलची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. पोलिसांनी फोन करणाऱ्या आरोपीचा शोध सुरु केला असून अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हॉटेल ललीतमध्ये सोमवारी संध्याकाळी ६ च्या सुमारास फोन करून वरील धमकी देण्यात आली होती. यानंतर हॉटेलमधील सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली. धमकी देणाऱ्या व्यक्तीने हॉटेमध्ये चार ठिकाणी बॉम्ब ठेवल्याचे सांगितले. हे बॉम्ब निकामी करण्यासाठी पाच कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली. एवढचं नाही तर हॉटेलच्या महाव्यवस्थापकाच्या कुटुंबीयांनाही धमकावण्यात आले आहे. हॉटेल प्रशासनाने या धमकीबाबत पोलिसांना माहिती दिली.

# राज्यातील नवनियुक्त मंत्र्यांना बंगल्याचे वाटप!

## सगळ्यात भारी बंगला शिंदे गटाच्या दीपक केसकरांच्या वाट्याला

। मुंबई । महाईन्यूज ।

**शिंदे फडणवीस सरकारच्या स्थापनेच्या महिनाभरानंतर मंत्रीमंडळ विस्तार झाला. विस्तारानंतर खातेवाटप करण्यात आलं. खातेवाटपाला होणाऱ्या विलंबामुळे विरोधकांकडून जोरदार टीका करण्यात येत होती. मात्र, आता खातेवाटपानंतर आज राज्यातील नवनियुक्त मंत्र्यांना शासकीय बंगले / निवासस्थानाचे वाटप करण्यात आले आहे.**



मंत्रीमंडळाचा विस्तार झाल्यावर आता कोणता बंगला कोणत्या मंत्र्याला मिळणार यावरुन चर्चा रंगत होती. तसेच सत्तांतरानंतर काही माजी मंत्र्यांनी बंगले रिकामे केले नव्हते. त्यामुळे नव्या मंत्र्यांना बंगले देण्यात अडचणी येत होत्या.

अखेर अनेक बंगले रिकामे झाल्यानंतर नवनिर्वाचित मंत्र्यांना बंगल्यांचं वाटप करण्यात आलं आहे.

मात्र, या मंत्र्यांना करण्यात आलेल्या बंगले वाटपात शिंदे गटाचे मंत्री दीपक केसकरांना मिळालेला बंगला सगळ्यात भारी असल्याचे बोलले जात आहे.

### मंत्रीमंडळात महिलांना स्थान मिळणार

मंत्रीमंडळ विस्तारादम्यान शिंदे गटातील ९ तर भाजपच्या ९ जणांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. या १८ मंत्र्यांमध्ये एकाही महिला आमदाराला स्थान मिळालं नाही. त्यावरुन विरोधकांकडून मोठ्या प्रमाणात टीका करण्यात आली होती. त्यानंतर आता शिंदे-फडणवीस यांच्या मंत्रीमंडळात महिलांना स्थान मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. दोन महिला आमदारांना मंत्रीपद दिलं जाणार आहे. एक कॅबिनेट आणि एक राज्यमंत्रीपद दिलं जाणार असल्याची चर्चा आहे. देवयानी फरांदे, माधुरी मिसाळ, मनिषा चौधरी आणि सीमा हिरे यांच्या नावाची चर्चा सुरु आहे.

### कोणाच्या वाट्याला कोणता बंगला

१. राहुल नार्वेकर, विधानसभा अध्यक्ष – शिवगिरी
२. राधाकृष्ण विखे-पाटील – रॉयलस्टोन
३. सुधीर मुनगंटीवार – पर्णकुटी
४. चंद्रकांत पाटील – अ-९ (लोहगड)
५. गिरीश महाजन – सेवासदन
६. गुलाबराव पाटील – जेतवन
७. संजय राठोड – शिवनेरी
८. सुरेश खाडे – ज्ञानेश्वरी
९. संदिपान भुमरे – ब-२ (रत्नसिंधू)
१०. उदय सामंत – मुक्तागिरी
११. रविंद्र चव्हाण – अ – ६ (रायगड)
१२. अब्दुल सत्तार – ब – ७ (पन्हाळगड)
१३. दीपक केसरकर – रामटेक
१४. अतुल सावे – अ – ३ (शिवगड)
१५. शंभूराज देसाई – ब – ४ (पावनगड)
१६. मंगलप्रभात लोढा – ब – १ (सिंहगड)

# महाविकास आघाडी अजूनही शाबूत, मग महापालिका निवडणुका एकत्र लढवणार का?

## निवडणुका एकत्र लढायच्या की स्वतंत्र याबाबतचा निर्णय झाला की कळवला जाईल – उद्धव ठाकरे

।मुंबई । महाईन्यूज ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या ४० आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळले. या बंडखोरीमुळे सत्तासमीकरणं बदलून गेली. सध्या राज्यात शिंदे गट-भाजपाच यांचे संयुक्त सरकार स्थापन झाले असून आगामी काळात राजकीय वर्तुळात कोणत्या घडामोडी घडणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. एकीकडे पावसाळी अधिवेशन सुरू असताना मुंबईत आज (२३




ऑगस्ट) महाविकास आघाडीच्या घटकपक्षांची बैठक झाली. या बैठकीनंतर उद्धव ठाकरे यांनी आम्ही महाविकास आघाडी म्हणून अजूनही एकत्र आहोत, असे सांगितले. तसेच त्यांनी आगामी महानगरपालिकेच्या निवडणुकीवरही भाष्य केले. या निवडणुका एकत्र लढायच्या की स्वतंत्र याबाबतचा निर्णय झाला की कळवला जाईल, असे उद्धव ठाकरे म्हणाले. महाविकास आघाडी म्हणून आपण एकत्र आहात. मग येणाऱ्या पालिका निवडणुका तुम्ही एकत्र लढवणार का? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांना विचारण्यात आला. या प्रश्नाचे उत्तर देताना "बऱ्याच दिवसांनी आम्ही एकत्र भेटलो आहोत. एकत्र भेटल्यानंतर जरा बरं वाटलं आहे. आम्ही कुठेही फुटलेलो नसून एकत्र आहोत. त्यामुळे पुढे काय करायचं याबाबत जेव्हा निर्णय होईल तेव्हा तुम्हाला निश्चित सांगू," असे उद्धव ठाकरे म्हणाले.

शिवसेना पक्ष आणि एकनाथ शिंदे गट यांच्यात सुरू असलेल्या न्यायालयीन लढाईवरदेखील त्यांनी प्रतिक्रिया दिली. "आम्ही करोना महामारीच्या संकटाचा सामना केला. तर हे संकट काय आहे? करोनाचे संकट हे जगावर होते. मात्र या संकटाला महाविकास आघाडीने चांगल्या पद्धतीने तोंड दिले. मला न्यायदेवतेवर विश्वास आहे. न्यायदेवतेच्या डोळ्यावर पट्टी असते कारण न्यायदेवतेला सगळे समान असतात. न्यायदेवतेच्या डोळ्यावर जरी पट्टी असली तरी जनता उघड्या डोळ्यांनी सगळं बघते. न्यायदेवता आणि जनता हे लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. हे आधारस्तंभ जोपर्यंत मजबूत आहेत, तोपर्यंत देशात लोकशाहीच राहील. येथे बेबंदशाही येणार नाही," असेदेखील उद्धव ठाकरे म्हणाले.

# टोलनाक्यांच्या आंदोलनावरुन टीका करणाऱ्यांना राज ठाकरेंचं उत्तर; म्हणाले, "हातात सत्ता द्या !



।मुंबई । महाईन्यूज ।

मुंबईत आज मनसेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा पार पडला. या मेळाव्यात राज ठाकरे यांनी राज्यभरातील मनसे पदाधिकारी व कार्यकर्तांना संबोधित केले. यावेळी राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यासह शिंदे-फडणवीस सरकारवरही जोरदार टीका केली. तसेच त्यांनी मनसे आंदोलनं अर्धवट सोडते या आरोपावरही उत्तर दिले. "टोलचा विषय हा मनसेने हाती घेतला होता. त्यानंतर अनेक अवैध टोल बंद झाले होते. आता सत्ता हातात द्या बाकीचे टोलही बंद करून देतो", असे ते म्हणाले. "इतर राजकीय पक्ष स्वत: काहीही काम करत नाही आणि आपल्या पक्षाबाबत खोटा प्रचार करतात. याचं कारण या सगळ्यांना टोल वाल्यांकडून पैसे जातात. या अपप्रचाराला तुम्ही उत्तरं दिली पाहिजे. त्या-त्या पक्षातल्या राजकीय नेत्यांना टोलबाबत विचारलं पाहिजे. टोल बंद करणार असं शब्द या राजकीय पक्षांनी दिला होता.

# शेतकरी आंदोलनादरम्यान मोदी सरकारचा मोठा निर्णय!

## एमएसपी पारदर्शकितेसाठी समितीची स्थापना

नवी दिल्ली

महाईन्यूज । प्रतिनिधी।

केंद्रातील मोदी सरकारने आश्वासन देऊनही अनेक मागण्या पूर्ण न केल्याने दिल्लीत पुन्हा एकदा शेतकरी आंदोलनास सुरुवात झाली आहे. अशात आंदोलनाची धग वाढू नये यासाठी केंद्र सरकार आता सावध भूमिका घेताना दिसत आहे. यातच काल शेतकरी आंदोलनादरम्यान केंद्राने किमान आधारभूत किंमतीबाबत (एमएसपी) स्थापन केलेल्या समितीची पहिली बैठक दिल्लीत पार पाडली.

यामध्ये एमएसपी अधिक प्रभावी आणि पारदर्शक बनविण्यासह मुद्द्यांवर लक्ष ठेवण्यासाठी चार उपगटांची स्थापना करण्यात आली. या चारही गटांची स्वतंत्र बैठक होणार असून समितीची शेवटची बैठक सप्टेंबरच्या अखेरीस होणार आहे.

समितीच्या शिफारशींच्या आधारे केंद्र सरकार भविष्यात



एमएसपी आणि इतर विषयांवर धोरणात्मक निर्णय घेईल. युनायटेड किसान मोर्चाने यापूर्वी यात सहभागी होण्यास नकार दिला होता. एमएसपी हमी कायदा आणावा, अशी त्यांची मागणी होती. यामुळे समितीच्या बैठकीला त्यांचा एकही नेता उपस्थित नव्हता. माजी कृषी सचिव संजय अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत झिरो बजेट आधारित शेतीला चालना देण्यावर भर देण्यात आला. तसेच देशाच्या बदलत्या गरजा लक्षात घेत पीक पद्धतीत बदल आणि एमएसपी अधिक प्रभावी आणि पारदर्शक करण्याच्या मार्गांवर विचारमंथन करण्यात आले. समितीमध्ये अध्यक्षांसह 26 सदस्य आहेत, तर एसकेएमच्या प्रतिनिधींसाठी तीन जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. समिती सदस्य विनोद आनंद यांनी सांगितले की, तीन विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

### समितीच्या माध्यमातून केली जाणार 'ही' कामं

1. शेतकरी गट सीएनआरआयचे सरचिटणीस आनंद म्हणाले की, पहिला गट हिमालयीन राज्यांसह पीक पद्धती आणि पीक वैविध्य यांचा अभ्यास करेल आणि त्या राज्यांमध्ये एमएसपी समर्थन कसे सुनिश्चित करता येईल यावर विचार करेल.

2. कृषी संशोधन परिषदेच्या अध्यक्षतेखालील कोरडवाहू शेतीसाठी केंद्रीय संशोधन संस्था, हैदराबाद, नागपूरस्थित नॅशनल ब्यूरो ऑफ सॉयल सर्व्हे अँड लँड यूज प्लॅनिंग देशभरातील पीक विविधता आणि पीक पद्धतींचा अभ्यास करेल.

3. राष्ट्रीय कृषी विस्तार व्यवस्थापन संस्था (MANAGE) च्या प्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली सेंद्रिय आणि नैसर्गिक शेती पद्धतींसह शून्य बजेट आधारित शेतीचा अभ्यास करेल आणि शेतकऱ्यांमध्ये एकमत निर्माण करेल.

4. आयआयएम-अहमदाबादचे सुखपाल सिंग यांच्या नेतृत्वाखालील सूक्ष्म सिंचनावरील दुसरा गट सूक्ष्म सिंचन शेतकरी केंद्रित करण्यासाठी अभ्यास करेल .सध्या सरकारच्या अनुदानातून सूक्ष्म सिंचन चालवले जाते आणि त्यासाठी शेतकऱ्यांकडून मागणी कशी निर्माण करता येईल, याचे परीक्षण हा गट करणार आहे.

# आमच्यासोबत राजकीय लढाई नक्कीच लढा

## भाजप आमदाराच्या वक्तव्यावर ओवैसी भडकले

हैदराबाद। महाईन्यूज । प्रतिनिधी।



भाजप आमदार टी राजा यांच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे प्रकरण जोर धरू लागले आहे. याआधी रात्री उशिरा शेकडो लोकांनी रस्त्यावर उतरून त्यांच्या विरोधात निदर्शने केली होती. त्यानंतर सकाळी टी राजा यांना अटक करण्यात आली. आता भाजप आमदाराच्या वक्तव्यावरून AIMIM प्रमुख असदुद्दीन ओवैसींचे वक्तव्य समोर आले आहे.

भाजप मुस्लिम आणि पैगंबर मोहम्मद यांचा द्वेष करत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ओवैसी म्हणाले, मी भाजप आमदाराच्या वक्तव्याचा निषेध करतो, या लोकांना हैदराबादमध्ये शांतता पहायची नाही. ते म्हणाले की या लोकांना भारताची सामाजिक जडणघडण नष्ट करायची आहे.

ओवैसी म्हणाले, आमच्यासोबत राजकीय लढाई नक्कीच लढा, पण असे नाही. ते पुढे म्हणाले, पंतप्रधान मोदी आणि भाजप अशा विधानांचे समर्थन करत नसतील तर त्यांनी यावर प्रतिक्रिया द्यावी. यासोबतच त्यांनी 'सर तन से जुडा' या घोषणेवरही टीका केली असून, कायदा हातात घेण्याचा अधिकार कोणालाही नाही, असे ते म्हणाले.

भाजप आमदार टी राजा सिंह यांनी नुकताच सोशल मीडियावर एक व्हिडिओ अपलोड केला आहे. या व्हिडिओबाबत त्याने प्रेषित मोहम्मद यांच्याबद्दल कथित टिप्पणी केली होती. हा संपूर्ण वाद सहा मिनिटे तीस सेकंदाच्या व्हिडिओशी संबंधित आहे. त्यांनी वादग्रस्त कॉमेडियन मुनव्वर फारुकीला लक्ष्य करत टिप्पणी केली. ते म्हणाले, एक विनोदी अभिनेता आहे जो थर्ड क्लास कॉमेडी करतो आणि हिंदूंना, भाजपच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना लक्ष्य करतो.

# शिवसेना कुणाची?आता लढाई घटनापीठासमोर!

## ठाकरे गटाला आपले म्हणणे मांडण्यासाठी अखेरची मुदत दिल्याने न्यायालयाने दोन दिवसांनी सुनावणी घेण्याचा घेतला निर्णय

।नवी दिल्ली । ।महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।



महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचे प्रकरण विस्तारित अशा पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे सोपविण्यात येणार आहे. गुरुवारी (ता.२५) या प्रकरणाची पुढील सुनावणी होणार आहे. भारतीय जनता पक्षाच्या साथीने शिवसेनेतील एकनाथ शिंदे यांच्यासह ५० आमदारांचा गट शिवसेनेपासून वेगळा झाल्यावर शिवसेना नक्की कोणाची, उद्धव ठाकरे यांची की एकनाथ शिंदे यांची, या राज्यातील अत्यंत महत्त्वाच्या प्रकरणाची सुनावणी घटनापीठाकडे सोपविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आज घेतला. या प्रकरणी निवडणूक आयोगातील सुनावणीलाही ठाकरे गटाने आक्षेप घेतल्याने व तेथील सुनावणीत ठाकरे गटाला आपले म्हणणे मांडण्यासाठी आजच अखेरची मुदत दिल्याने न्यायालयाने दोन दिवसांनी याची सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला.

राज्यपालांनी नव्या सरकारला शपथ देवविणे, तत्कालीन उपसभापती नरहरी झिरवाळ यांनी घेतलेला, शिंदे गटाच्या आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय आदी मुद्द्यांवरील पाच याचिका न्यायालयासमोर सुनावणीसाठी आहेत. या प्रकरणी राज्यपालांनी शिंदे फडणवीस सरकारला बहुमताची चाचणी करायला सांगितली ती घटनात्मकदृष्ट्या वैध होती का, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा निर्णय घटनापीठाने दिल्यावरच उर्वरित प्रकरणाचे भवितव्य ठरणार आहे. याच दरम्यान निवडणूक आयोग हा शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह कोणाकडे राहणार याचाही महत्त्वाचा निर्णय घेणार आहे. सरन्यायाधीश रमणा यांच्या अध्यक्षतेखाली न्या. कृष्ण मुरारी व न्या. हिमा कोहली या खंडपीठाने हा निकाल दिला. यामुळे नवीन सरन्यायाधीश न्या. उदय लळित यांच्यासमोर या प्रकरणाचा अंतिम निकाल लागेल.

दरम्यानच्या दोन दिवसांत पाच सदस्यीय घटनापीठाची रचना अंतिम करण्यात येईल. त्या पीठामध्ये कोण असणार याचा निर्णय न्या. रमणा हेच घेतील. तो सरन्यायाधीश म्हणून न्या. रमणा यांचा अखेरचा दिवस असेल. ते या घटनापीठात असतील तर, त्यांची जागा नवीन सरन्यायाधीश न्या. लळित घेतील. यापूर्वी अशा केशवानंद भारती प्रकरणात न्यायालयाने घेतलेला निकाल प्रस्तावित घटनापीठासमोर असेल. चार ऑगस्टनंतर सलग चार वेळा सुनावणी स्थगित झालेल्या या प्रकरणी आज सुनावणी होणार का, याचा निर्णय सकाळीही झालेला नव्हता. काल रात्री व आज सकाळी आलेल्या आजच्या प्रकरणांच्या यादीत हे प्रकरण नव्हते. मात्र सकाळी साडेअकरानंतर न्यायालयाच्या संकेतस्थळावर, आजच हे प्रकरण ऐनवेळी सुनावणीला येणार असल्याची माहिती प्रकटली. त्यातही प्रथम दुपारी साडेबारा वाजता सुनावणी सुरू झाली. सरन्यायाधीश रमणा निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. आणखी तीनच दिवसांत ते निवृत्त होत असून मावळते सरन्यायाधीश घटनात्मकदृष्ट्या संवेदनशील प्रकरणी अंतिम निकाल देण्याचे टाळतात ही परंपरा आहे.

शिंदे गटाच्या १६ आमदारांचे काय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी आठ ऑगस्टला सुनावणी होणार होती. मात्र, ही तारीख बदलून १२ ऑगस्ट करण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा बदलून २२ ऑगस्ट करण्यात आली होती. यापूर्वी ३ आणि ४ ऑगस्ट अशी सलग दोन दिवस सुनावणी झाली होती. तेव्हापासूनच सातत्याने हे प्रकरण पुढे ढकलले जात होते. शिवसेनेसाठी हे प्रकरण अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे त्यांनी आज हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात तातडीने सुनावणी घेण्याची विनंती केली होती.




# उनाड' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस

जिओ स्टुडिओज प्रस्तुत, बहुचर्चित व प्रख्यात चित्रपट दिग्दर्शक आदित्य सरपोतदार यांचा चित्रपट 'उनाड' उन्हाळ्यात २०२३ ला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. ज्योती देशपांडे, अजित अरोरा, चंद्रेश भानुशाली आणि प्रितेश ठक्कर निर्मित 'उनाड' चित्रपट तरूणांवर चित्रीत असून आशुतोष गायकवाड, हेमल इंगळे, अभिषेक भराटे, चिन्मय जाधव, देविका दफ्तरदार आणि संदेश जाधव हे कलाकार प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत.

चित्रपटाबद्दल दिग्दर्शक आदित्य सरपोतदार म्हणतात, " 'उनाड' हा चित्रपट तरूणांवर चित्रीत करण्यात आला असून हा चित्रपट पुढील वर्षी उन्हाळ्यात प्रदर्शित होत आहे. चित्रपट युवकांना योग्य दिशा दाखवणारा ठरेल अशी मला आशा आहे.

"चेक रिपब्लिक येथे झालेल्या झ्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात युवा विभागातील फिचर फिल्म्सच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेकरीता अधिकृत प्रवेशिका म्हणून 'उनाड'ची नुकतीच निवड झाली. 'उनाड'ही महाराष्ट्रातील एका छोट्या गावातील हर्णे येथील मासेमारी करणाऱ्या तीन युवकांची कथा आहे.

# कृष्णा अभिषेकने 'द कपिल शर्मा शो' सोडण्यामागचं कारण आलं समोर

कपिल शर्माचा 'द कपिल शर्मा'शो येत्या सप्टेंबर महिन्यापासून हिंदी टेलिव्हिजनवर दाखवला जाणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून चाहते या कार्यक्रमाची आतुरतेने वाट पाहत आहेत. यावेळी या शोमध्ये पुन्हा एकदा हास्याचा डबल डोसपाहायला मिळणार आहे. दरम्यान, अशातच या शोच्या चाहत्यांसाठी निराशाजनक बातमी समोर आली आहे. या शोमधील कलाकार कृष्णा अभिषेकने या कार्यक्रमामधून काढता पाय घेतला आहे. दरम्यान, ही बातमी समोर येताच अनेकजण वेगवेगळे तर्क-वितर्क लावू लागले होते. परंतु आता या मागचं खरं कारण समोर आलं आहे.

कृष्णा अभिषेकने सांगितलं शो सोडण्यामागचं खरं कारण

'द कपिल शर्मा' या शोमध्ये कृष्णान साकारत असलेली सपनाच्या भूमिकेने सगळ्यांना खळखळून



हसवले. मात्र, इथून पुढे या शोमध्ये सपना ही भूमिका साकारणारे कृष्णा दिसणार नसल्याने चाहते निराश झाले आहेत. या शोमधून बाहेर पडण्यामागचे कारण कृष्णा अभिषेकने सांगितले आहे. खरंतर, या शोच्या करारातील समस्यांमुळे त्याने हा शो सोडण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच या कार्यक्रमाशी संबंधीत एका व्यक्तीने सांगितले की, या शोचे निर्माते आणि कृष्णाने सर्व गोष्टी ठिक करण्याचे अनेक प्रयत्न केले. परंतु आर्थिक व्यवहारामुळे कृष्णाने हा शो सोडण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, मागील काही दिवसांपासून कृष्णाने हा शो सोडण्यामागे कपिल शर्मा जबाबदार असल्याचे म्हटले जात होते. परंतु मिळालेल्या माहितीनुसार, कृष्णा आणि कपिलमध्ये काहीही वादविवाद नाहीत. तसेच या शोचे निर्माते वेगळे आहेत. त्यामुळे कपिल आणि कृष्णामध्ये वाद असल्याच्या फक्त अफवा आहेत.


# वीरांगणा 'मोगलमर्दिनी छत्रपती ताराराणी' चित्रपटाचा मुहूर्त संपन्न !




औरंगजेबासारख्या स्वराज्यावर टपून बसलेल्या दिल्लीपती बलाढ्य मोगल पातशहाला महाराष्ट्राच्या मातीत कायमचा संपवण्यात स्वराज्यातील स्त्रिया देखील पुरुष योध्यांपेक्षा कमी नाही, हे दाखवून देणाऱ्या आणि मराठ्यांचा देदीप्यमान संग्राम असणाऱ्या भारतीय इतिहासाला पराक्रमाच्या उंचीवर नेऊन ठेवणाऱ्या वीरांगना म्हणजे महाराणी छत्रपती ताराबाई. त्यांच्याच जीवनावर आधारीत 'मोगलमर्दिनी छत्रपती ताराराणी' या चित्रपटाचा मुहूर्त आज संपन्न झाला आहे. मुंबई मध्ये या चित्रपटाच्या शूटिंगला मोठ्या दिमाखात सुरूवात झाली असून या चित्रपटासाठी चित्रनगरी मध्ये भव्य सेट उभारला आहे. संपूर्ण सेट, हा इतिहासातील पराक्रमांमध्ये न्हाऊन निघाला आहे. अक्षय बर्दापूरकर आणि 'मंत्रा व्हिजन' निर्मित हा चित्रपट येत्या दिवाळीमध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. उत्तम कथानकाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन विविध विषयांवरचे दर्जेदार चित्रपट जगभरातल्या प्रेक्षकांपर्यंत पोचवण्यासाठी 'प्लॅनेट मराठी' कायम अग्रेसर असतं. हा चित्रपट जेष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या "मोगलमर्दीनी महाराणी ताराबाई" या ग्रंथावर आधारीत असून, "मोगलमर्दीनी छत्रपती ताराराणी" या चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद डॉ. सुधीर कोंडीराम निकम यांचे आहेत आणि राहुल जनार्दन जाधव यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे.

# हेमंत ढोमे दिग्दर्शित 'सनी' लवकरच होणार प्रदर्शित

गेल्या वर्षी 19 नोव्हेंबर ला 'झिम्मा'ने लोकांना वेड लावले होते तर या वर्षी पुन्हा त्याच शुक्रवारी 'सनी' लोकांचे मनोरंजन करण्यासाठी येत आहे. लॉकडाऊननंतर पहिल्यांदाच 'झिम्मा' या सुपरहिट ठरलेल्या सिनेमानंतर हेमंत ढोमे यांचा 'सनी' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'झिम्मा' नंतर प्रेक्षकांच्या अपेक्षा अजूनच उंचावल्या आहेत. प्रेक्षकांच्या हयाच अपेक्षांवर खरे उतरण्यासाठी बरोबर एक वर्षांनी 'सनी' हा सिनेमा 18 नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.




'सनी' हा सिनेमा 18 नोव्हेंबरला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. ललित प्रभाकर यात 'सनी'ची मध्यवर्ती भूमिका साकारत असून ह्या सिनेमाचे दिग्दर्शन हेमंत ढोमे यांनी केले आहे. अक्षय विलास बर्दापूरकर, क्षिती जोग, विराज गवस व उर्फी काझमी हे सिनेमाचे निर्माते आहेत. तसेच संतोष खेर, तेजस्विनी पंडित सह-निर्माते असून सिनेमाचे लेखन इरावती कर्णिक यांनी केलेले आहे. दिग्दर्शक हेमंत ढोमे सिनेमाबद्दल म्हणतात, " 'झिम्मा' ला मिळालेल्या उत्तम प्रतिसादानंतर प्रेक्षकांशी एक वेगळं नातं तयार झालंय आणि त्या आपुलकीच्या नात्यानेच आम्ही जबाबदारीने 'सनी' हा सिनेमा घेऊन आलोय. आपल्या आयुष्याबद्दल चांगलं वाटायला लावणारी ही कथा प्रेक्षकांसमोर आणताना प्रचंड आनंद होतोय. प्रेक्षकांनी ज्याप्रमाणे 'झिम्मा'ला प्रेम दिले तसेच ते 'सनी'ला हि मिळेल अशी खात्री आहे."

# सातारा आणि कोल्हापूरमध्ये रंगली 'अप्पी आमची कलेक्टर' मालिकेची भव्य रॅली

मराठी टेलिव्हिजनवर 22 ऑगस्टपासून एक नवीन मालिका प्रेक्षकांच्या भेटीला आली, "अप्पी आमची कलेक्टर" ही मालिका एक वेगळा विषय घेऊन येत आहे. अपर्णा सुरेश माने म्हणजे अप्पी, ही ती मुलगी आहे जी खेडे गावात रहाते, जिथे शैक्षणिक सुविधा उपलब्ध नाहीत, तिला कुठले मार्गदर्शन नाही. पण तिचं ध्येय खुप मोठ्ठ आहे. तिला येणा-या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक अडचणींवर मात करुन ती कलेक्टर होते. अशी ही संघर्ष कथा आहे.

ह्या प्रेरणात्मक मालिकेचे लेखन अभयसिंग जाधव ह्यांचे असून दिग्दर्शन आशुतोष बाविस्कर ह्यांचे आहे. ह्या मालिकेत शिवानी नाईक सोबत रोहित



परशुराम प्रमुख भूमिकेत असणार आहे. सातारा आणि कोल्हापूर येथे "अप्पी आमची कलेक्टर" या मालिकेच्या प्रचाराच्या निमित्ताने रॅलीच आयोजन करण्यात आले होते. ह्या रॅली साठी पत्रकारांनी , सातारकरांनी व कोल्हापूरकरांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. ह्या रॅलीचे खास आकर्षण म्हणजे मालिकेच्या निर्मात्या श्वेता शिंदे आणि आपली सगळ्यांची लाडकी शिवानी नाईक (अप्पी) ह्या दोघीनी दणक्यात ढोल वाजवून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.कार्यक्रमाला सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी (कलेक्टर) माननीय श्री रुचेश जयवंशी , अप्पी – शिवानी नाईक , बापू – संतोष पाटील तसेच मालिकेचे निर्माते श्वेता शिंदे, संजय खांबे आणि छत्रपती शिवाजी कॉलेजच्या वतीने उपप्राचार्या शेख मॅडम व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी माननीय जिल्हाधिकारी यांनी आपले मोलाचे मार्गदर्शन केले तसेच कलाकारांनी आपले अनुभव व्यक्त केले.

## शॉर्ट न्यूज »

### सायनाची धडाक्यात सुरूवात



**टोकियो । महाईन्यूज**

लंडन ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक पटकावणाऱ्या सायना नेहवालने बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत दमदार सुरूवात केली. तिने हाँग काँगच्या चेऊंग ननाग यी चा सरळ दोन गेममध्ये पराभव केला. सायनाने 38 मिनिटात हाँग काँगच्या यीचे पॅक अप केले. तिने सामना 21 - 19, 21 - 09 असा जिंकला.

32 वर्षाच्या सायनाने यापूर्वी जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत रौप्या आणि कांस्य पदक जिंकले आहे. तिने यंदाच्या बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत प्री क्वार्टरफायनलमध्ये प्रवेश केला. दुसऱ्या फेरीतील सायना विरूद्ध खेळणाऱ्या नोझोमी ओकुहाराने दुखापतीमुळे स्पर्धेतूनच माघार घेतली. त्यामुळे बाय मिळालेल्या सायनाचा प्री क्वार्टरफायनलचा मार्ग मोकळा झाला.

# वनडे क्रिकेटबाबत स्टोक्सने व्यक्त केले रोखठोक मत!

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

बेन स्टोक्सने इंग्लंडच्या कसोटी संघाचे नेतृत्व हातात घेतल्यापासून त्याने आपल्या प्राथमिकता बदलल्या आहेत. स्टोक्सने क्रिकेटच्या तीन फॉरमॅटच्या ताणातून मुक्तता मिळवी यासाठी वनडे क्रिकेटमधून निवृत्ती देखील जाहीर केली आहे. दरम्यान, बेन स्टोक्सला त्याची बेन स्टोक्स : फिनिक्स फ्रॉम अॅशेस या माहितीपटानिमित्त प्रश्न विचाण्यात आले. यावेळी त्याला वनडे क्रिकेटच्या भविष्याबद्दल देखील प्रश्न विचारण्यात आले. वाढत्या टी 20 फ्रेंचायजी क्रिकेटमुळे वनडे क्रिकेटचे भवितव्य धोक्यात आले आहे असे मत अनेक जाणकारांनी व्यक्त केले आहे. दरम्यान, याबाबतच नुकतीच अकाली वनडेमधून निवृत्ती घेतलेल्या बेन स्टोक्सला वनडे क्रिकेटच्या भविष्याबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी स्टोक्स म्हणाला, 'वनडे क्रिकेटचे भवितव्य धोक्यात आले आहे का हा प्रश्न सध्याच्या जास्त क्रिकेट होत असलेल्या जगात रास्त प्रश्न आहे. अतिक्रिकेटचा फटका कोणत्या तरी एका फॉरमॅटला बसण्याची शक्यता आहे. आयसीसीने याबाबत लक्ष दिले पाहिजे. क्रिकेट कार्यक्रमांचे नियोजन नव्याने करण्याची किंवा वनडे क्रिकेटचा फॉरमॅट बदलण्याची आवश्यकता आहे.'




वाढत्या टी 20 फ्रेंचायजी क्रिकेटमुळे वनडे क्रिकेटचे भवितव्य धोक्यात आले आहे असे मत अनेक जाणकारांनी व्यक्त केले आहे. दरम्यान, याबाबतच नुकतीच अकाली वनडेमधून निवृत्ती घेतलेल्या बेन स्टोक्सला वनडे क्रिकेटच्या भविष्याबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी स्टोक्स म्हणाला, 'वनडे क्रिकेटचे भवितव्य धोक्यात आले आहे का हा प्रश्न सध्याच्या जास्त क्रिकेट होत असलेल्या जगात रास्त प्रश्न आहे. अतिक्रिकेटचा फटका कोणत्या तरी एका फॉरमॅटला बसण्याची शक्यता आहे. आयसीसीने याबाबत लक्ष दिले पाहिजे

दरम्यान, स्टोक्सने टी 20 आणि द हंड्रेड सारख्या स्पर्धांच्या जगात वनडे सामने 40 षटकांचे करण्याचा सल्ला दिला. स्टोक्स म्हणाला की, 'तुम्ही इंग्लंडमध्ये पाहू शकता की द हंड्रेडच्या रूपात एक वेगळाच क्रिकेट प्रकार तयार केला. तो आता टी 20 च्या बरोबरीने खेळला जात आहे. माझे असे वैयक्तीक मत आहे की 50 षटकांच्या वनडे सामन्याऐवजी 40 षटकांचा सामना खेळवला जावू शकतो.' स्टोक्सने वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याबात देखील आपला विचार समोर ठेवला. तो म्हणाला की, 'माझ्यासाठी हा खूप अवघड निर्णय होता. मात्र यामुळे माझ्यासाठी गोष्टी सोप्या झाल्या. मी खूप काळापासून याबाबत विचार करत होतो की मला मर्यादित षटकांच्या एका प्रकारातून निवृत्ती घ्यावी लागले.'

# भारत मुंबईतून तर पाकिस्तान ॲमस्टरडॅममधून दुबईसाठी रवाना

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**



आशिया कप 2022 येत्या 27 ऑगस्टपासून सुरू होत आहे. भारताचा पहिलाच सामना कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानसोबत 28 ऑगस्टला होणार आहे. मात्र या सामन्याची क्रेज आतापासूनच पहावयास मिळत आहे. दरम्यान, या हाय व्होल्टेज सामन्यासाठी भारत आणि पाकिस्तानचे संघ दुबईसाठी आज रवाना झाले. पाकिस्तानचा संघ नेदरलँडविरूद्धची मालिका खेळून थेट ॲमस्टरडॅममधून दुबईसाठी रवाना झाली. तर भारतीय संघ भारतातून दुबईसाठी रवाना झाला. पाकिस्तानने गेल्याच वर्षी संयुक्त अरब अमिरातीमध्येच झालेल्या टी 20 वर्ल्डकपमध्ये भारताचा 10 विकेट्सनी पराभन केला होता. वर्ल्डकप इतिहासातील हा भारताचा पाकिस्तानकडून झालेला पहिला पराभव होता. गेल्या टी 20 वर्ल्डकपमध्ये पाकिस्तानने भारताचा दुबईतच पराभव केला होता. त्यामुळे पाकिस्तान संघाचे मनोबल वाढले असेल. दुसरीकडे तेव्हाच्या भारतीय टी 20 संघात आणि आताच्या टी 20 संघात बराच फरक झाला आहे. आता संघाची धुरा रोहित शर्माच्या खांद्यावर आली आहे. त्याचा कॅप्टन म्हणून विजयाचा ट्रॅक रेकॉर्ड जबरदस्त आहे.

भारत आणि पाकिस्तानचे संघ दुबईसाठी आज रवाना झाले. पाकिस्तानचा संघ नेदरलँडविरूद्धची मालिका खेळून थेट ॲमस्टरडॅममधून दुबईसाठी रवाना झाली. तर भारतीय संघ भारतातून दुबईसाठी रवाना झाला. पाकिस्तानने गेल्याच वर्षी संयुक्त अरब अमिरातीमध्येच झालेल्या टी 20 वर्ल्डकपमध्ये भारताचा 10 विकेट्सनी पराभन केला होता.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही